D:\APA 2024\Letter 2024.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा :

१) कृषि व पदूम विभागाचा शासन निर्णय क्र.अेजीयू-३७१९/ सिआर-४१/६-ए दिनांक १२.८.२०२१

२) कृषि व पदूम विभागाचा शासन निर्णय क्र.अेजीयू-३७२१/ सिआर-१५०/६-ए दिनांक १९.९.२०२२

३) कृषि व पदूम विभागाची अधिसुचना क्र.मकृप-१०२३/सिआर-२४/६-ए दिनांक ३०.६.२०२३

**कॅस अंतर्गत प्राध्यापक (Academic Level-14) वरून वरिष्ठ प्राध्यापक(Academic Level-15) पदाची वेतनश्रेणी मंजूर करण्यासाठी प्रस्ताव सादर करणे बाबत.**

## विद्यापीठ परिपत्रक

क्र.२०२४/प्र.क्र.१२९७/कॅस लेवल १४ ते १५/आस्था-१/2112

दिनांक : १५ एप्रील २०२४ 16

**परिपत्रक :**

संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिका-यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयात एएल-१५ साठी रु.१८२२००-२२४१०० अशी वेतनश्रेणी मंजूर आहे. संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगानूसार शिक्षकवर्गीय अधिका-यांना कॅस अंतर्गत वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्याबाबतच्या पात्रता, तरतूदी व इतर अनुषंगीक बाबी स्पष्ट केलेल्या आहेत.

कॅस अंतर्गत लाभ मंजूर करण्याबाबतच्या सविस्तर तरतूदी व इतर अनुषंगीक बाबी संदर्भ क्र.३ अन्वये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सुधारणा परिनियम २०२३ प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतूदीच्या अनुषंगाने कॅस अंतर्गत प्राध्यापक पदावरून वरिष्ठ प्राध्यापक (Academic Level - 14 to Academic Level - 15) या पदाच्या वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करण्याबाबत विनंती अर्ज प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील पात्र सर्व शिक्षकवर्गीय अधिका-यांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय १ ते ३ वरील शासन निर्णय व परिनियम २०२३ नूसार जे स्वतःस कॅस अंतर्गत प्राध्यापक पदावरून वरिष्ठ प्राध्यापक (Academic Level - 14 to Academic Level - 15) या पदाच्या वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करण्यासाठी पात्र समजतात व त्यामध्ये नमूद पात्रता धारण करतात त्यांनी त्यांचे प्रस्ताव विहित नमून्यात आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह **दिनांक ३० एप्रील २०२४ पर्यंत** योग्य माध्यमाद्वारे या कार्यालयास सादर करावेत.

विहित मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास अथवा अपुर्ण प्रस्ताव सादर केल्यामुळे कॅस अंतर्गत वरिष्ठ प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी मंजूर करण्यास अपात्र झाल्यास त्यास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

(पु.की.काळे) 16/4/24

कुलसचिव

**प्रत :**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता कृषि / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयाच्या कार्यरत / सेवानिवृत्त पात्र शिक्षकवर्गीय अधिका-याच्या निर्देशनास आणून द्यावे.

२. नियंत्रक वनामकृवि, परभणी.

३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

४. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.